# प्रेस नोट

## बार्टीमार्फत यु.पी.एस.सी-नागरी सेवा व्यक्तिमत्व चाचणी परीक्षेचे ऑनलाईन प्रशिक्षण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे मार्फत यु.पी.एस.सी.- नागरी सेवा मुख्य परीक्षा-२०२० मध्ये उत्तीर्ण झालेल्या २२ उमेदवारांना व्यक्तिमत्व चाचणी परीक्षा २०२० करिता आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ दिला आहे. महाराष्ट्र राज्यातील अधिकाधिक उमेदवारांची केंद्रीय सनदी अधिकारी पदी नेमणूक होण्याकरिता उमेदवारांना आर्थिक सहाय्य योजनेसोबतच मुलाखतीचे पूर्वतयारी प्रशिक्षण देण्याची योजना बार्टी संस्थेने आखली आहे. त्यानुषंगाने कोव्हीड १९ या महामारीच्या काळात महाराष्ट्र शासनाने आखून दिलेल्या निर्देशानुसार अनुसूचित जातीच्या २२ पात्र उमेदवारांना दि. १० मे २०२१ पासून यु.पी.एस.सी-नागरी सेवा व्यक्तिमत्व चाचणी परीक्षेचे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येत आहे.

डॉ. प्रशांत नारनवरे, आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या ऑनलाईन मार्गदर्शनपर व्याख्यानातून सदर पूर्वतयारी प्रशिक्षणाचे उद्घाटन करण्यात आले. सदर प्रशिक्षण दि. १३ जून २०२१ पर्यंत देण्यात येणार असून यामध्ये वरिष्ठ केंद्रीय सनदी अधिकारी या उमेदवारांना मार्गदर्शन करणार आहेत. प्रशिक्षणादरम्यान उमेदवारांचे दोन मॉक इंटरव्ह्युव घेण्यात येतील.

1915

धम्मज्योती गजभिये, IPoS
महासंचालक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन
व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे